**प्रकरण - २**

**(पुस्तिका -१)**

**संस्थेचा तपशील, कार्य व कर्तव्ये**

उप जल अभियंता (पू.उ.)

**१.१ रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील**

प‍ूर्व उपनगरातील ग्राहकांना पिण्याचे पाणी पुरवणे.

**१.२ या कार्यालयाचे ध्येयः-**

प‍ूर्व उपनगरातील ग्राहकांना, पिण्यायोग्य व पुरेसे पाणी सम प्रमाणात पुरविणे.

**१.३ या प्राधिकरणाच्या निर्मितीबाबत संक्षिप्त इतिहासः**

सन १८३६ मध्ये बी डब्लु डब्लु (बॉम्बे वॉटर वर्कस)ची स्थापना झाली आणि तेंव्हापासून या विभागाकडे पाणीपुरवठा व्यावस्थेच्या वितरण,संचालन व परिरक्षणाची जबाबदारी आहे .

महानगरपालिका कायदा १९८८ अन्वये महापालिकेचे अनिवार्य कर्तव्य खालील प्रमाणे आहे:-

"सार्वजनिक व खाजगी मालमत्तेस जलवितरण प्रणाली मार्फत पाणीपुरवठा करणे व त्यासाठी बांधकामे करणे व केलेल्या कामांचे परिरक्षण करणे"

जल अभियंता खाते हे मुलत: वर उल्लेखलेल्या बाबींसाठी जबाबदार आहे. वितरण प्रणाली सुलभरीत्या व्हावी त्याकरीता प्रशासनाने मुंबई महानगराचे शहर विभाग, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे हे तीन प्रशासकीय विभाग केले आहेत. या अनुषंगाने वर उल्लेखीत विभागांकरीता उप जल अभियंता नेमलेले असून ते उप जल अभियंता (शहर), उप जल अभियंता (पूर्व उपनगरे) व उप जल अभियंता (पश्चिम उपनगरे) असे आहेत.

**१.४ या प्राधिकरणाची कर्तव्ये -**

प‍ूर्व उपनगरातील पाणीपुरवठा यंत्रणा व अनुषंगीक कामांवर देखरेख करणे.

**१.५ या प्राधिकरणाची मुख्य कार्यपध्दती व कार्ये -**

(i) मुंबई महानगराच्या पूर्व उपनगरांमध्ये विभागीय कार्यालयातून करण्यात येणाऱया पिण्याच्या पाणी वितरणाच्या कामांवर देखरेख करणे.

(ii) प्राप्त अधिकारांनुसार अंदाजपत्रक, कर्मचाऱयांचे पगार, विविध मंजुऱया इत्यादि कर्तव्ये पार पाडणे.

(iii) संबंधित कार्यालयीन कामकाज करणे.

**१.६ या प्राधिकरणाने नागरिकांना पुरवण्यात येणाऱया सुविधा व त्यासंबंधीची सविस्तर माहिती.**

प‍ूर्व उपनगरात पाणी पुरवठा करणे. प‍ूर्व उपनगरात उपलब्ध झालेले पाणी विविध पाणी वितरण विभागांतील ग्राहकांना पुरविणे.

**१.७ कार्यालयाच्या संघटनात्मक रचनेचा तक्ता सोबत जोडला आहे.**

**१.८ या प्राधिकरणाच्या वाढीव सुलभ व सुटसुटीत कामगिरीसाठी नागरिकांकडून अपेक्षा**

i. पाण्याचा विवेकपूर्वक वापर करणे.
ii. जलवितरण संस्थेचे नुकसान न करणे तसेच होऊ न देणे.
iii. जलदेयकांचा तसेच जलकरांशी संबंधीत करांचा भरणा वेळेवर करणे.
iv. जलवितरण करण्यासाठी महापालिकेस सहकार्य करणे.
v. पाण्याच्या अवैध वापराबाबतची माहिती महापालिकेस देणे.

**१.९ नागरिकांचे सहकार्य व सहभागासाठी योजना व पध्दती -**

जनजागृती करीता जलमेळाव्याचे आयोजन केले जाते.

**१.१० <u>नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध यंत्रणा –</u>**

i. नागरीक आपली तक्रार घाटकोपर यार्ड येथे नियंत्रण कक्षावरती 022-25153258 या दूरध्वनी क्रमांकावर नोंदवू शकतात.

ii. नागरीक आपली तक्रार 1916 ह्या विना आकार (Toll Free) दूरध्वनी क्रमांकावर नोंदवू शकतात.

iii. संबंधीत विभाग कार्यालयाशी संपर्क साधू शकतात.

**उप जल अभियंता (पू.उ.)**


उप जल अभियंता (पू.उ.)
काअजका (पूउ)द
काअजका (पूउ)उ
काअजका (गअ)पूउ
सअजका (वा व नि)
प्र.अ.ज.का. (पू.उ.)
सअजका एल
सअजका एम/पूर्व
सअजका एम/पश्चिम
सअजका एन
सअजका एस
सअजका टी
सअजका (गअ)पूउ/द
सअजका (गअ)पूउ/उ
दुअजका (1)
मुख्य लिपिक
वरिष्ठ लघुलेखक
दुअजका एल (5)
दुअजका एम/पूर्व(5)
दुअजका एम/पश्चिम (3)
दुअजका एन (4)
दुअजका एस (5)
दुअजका टी (3)
दुअजका (गअ)पूउ/द (5)
दुअजका (गअ)पूउ/उ (4)
कअजका (5)
लिपिक (4)
कअजका एल (16)
कअजका एम/पूर्व (12)
कअजका एम/पश्चिम (10)
कअजका एन (12)
कअजका एस (12)
कअजका टी (5)
कअजका (गअ)पूउ/द (1)
कअजका (गअ)पूउ/उ (1)
नाईक